Reg. No. NP CITY/236/2018-20.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ८, अंक १] बुधवार, जानेवारी ५, २०२२/पौष १५, शके १९४३ [पृष्ठे ५, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग एक—नागपूर विभागीय पुरवणी

### संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. १.

**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ३), यांजकडून**

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (महाराष्ट्र सुधारणा अधिनियम २०१८) कलम ११ (१) अन्वये.—**

क्रमांक अका.-उजि(भूसं. क्र. ३) वि.पा.वि.म.-कावि-०४-२०२२.—

ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण-११-२०१४-प्र. क्र. ७७–अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यानंतर यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे.) याद्वारे असे सूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनीक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल ईतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचीत शासन असल्याचे मानन्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी, (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आलेला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहे. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावी.)

आणि ज्याअर्थी, सामाजिक निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत याप्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्त करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा.) ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण ४ खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सुट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दी पुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेला कोणत्याही हाणीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) नुसार जिल्हाधिकारी , भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश “ उक्त नियम ” असा करण्यात आलेला आहे.) त्यांच्या नियम १०, उपनियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचीत शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखाली जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी श्रीमती शिवनंदा लंगडापूरे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्रमांक-३), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यास पदनिर्देशीत करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक १-अ-६५-२०१९-२०२०, प.ह.नं. ७६, गाव पुल्लर, तालुका भिवापूर, जिल्हा नागपूर.

| अनुक्रमांक | सर्व्हे क्र. | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | १६२/१ | ० ५२ |
| २ | १६२/२ | ० ९४ |
| ३ | १६२/३ | ० ०४ |
| ४ | १६४/१ | १ ०० |
| ५ | १६५/१ | १ २१ |
| ६ | १६५/२/१ | १ ३६ |
| ७ | १७१/१ | ० २९ |
| ८ | १७५ | ० २२ |
| ९ | १८० | ० २० |
| १० | १८१/१ | ० १५ |
| ११ | १९२/१ | ० ८५ |
| १२ | १९४/१ | ० १७ |
| १३ | १९४/२ | ० ०३ |
| १४ | १९५/१ | ० २० |
| १५ | १९७ | ० ५९ |
| १६ | १९९ | ० १० |
| १७ | २००/१ | ० ३० |
| १८ | २००/२ | ० २० |

अनुसूची-एक–चालू

| (१) | (२) | (३) |
| --- | --- | --- |
| | | हे. आर |
| १९ | २०१/१ | ० ८५ |
| २० | २०९/१ | ० २० |
| २१ | २१०/१ | ० २५ |
| २२ | २११ | ० १० |
| २३ | १५९/३-१ | ० ०६ |
| | एकूण . . | ९ ८३ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण**

प्रकल्पाचे नाव : गोसेखुर्द प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन : गोसेखुर्द धरणाअंतर्गत बुडीत क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत.

समाजाला मिळणारे लाभ : गोसेखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाअंतर्गत असून योजनेची सिंचन क्षमता निर्मितीचे उध्दीष्ट साध्य करणेसाठी संपादन पूर्ण करणे आवश्यक आहे व याचा लाभ शेतीसाठी, सार्वजनीक पाणीपुरवठा व उद्योगधंदे करीता होणार आहे.

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

विस्थापीत होत नाही.

**अनुसूची-चार**

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास : करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश. : भूमी संपादन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १० (क) अन्वये महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना दिनांक १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनीयमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागू करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम : निरंक

आ. प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता : निरंक

इ. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचे तपशील. : निरंक

**टीप** : उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ३), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

भाग १ (असा.) (ना.वि.पु.) म. शा. रा., अ. क्र. २.

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (महाराष्ट्र सुधारणा अधिनियम २०१८) कलम ११ (१) अन्वये.—**

क्रमांक अका.-उपजि(भूसं. क्र. ३) वि.पा.वि.म.-कावि-०५-२०२२.—

ज्याअर्थी, भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड (इ) च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक संकीर्ण-११-२०१४-प्र. क्र. ७७–अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यानंतर यापुढे जिचा निर्देश " उक्त अधिसूचना " असा करण्यात आलेला आहे.) याद्वारे असे सूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ खंड (झेड अे) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनीक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टर पेक्षा अधिक नसेल ईतक्या क्षेत्राकरीता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचीत शासन असल्याचे मानन्यात येईल.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, नागपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एक मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश " उक्त जमीन " असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) सार्वजनिक प्रयोजनासाठी, (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आलेला आहे.) आवश्यक आहे अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोन मध्ये दिलेले आहे.

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्वये याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे.

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमी संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीन मध्ये दिलेली आहे. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावी.)

आणि ज्याअर्थी, सामाजिक निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चार मध्ये दिलेला आहे.

आणि ज्याअर्थी, कलम ४३ पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाच मध्ये दिलेला आहे. (नियुक्त करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा.) ;

त्याअर्थी, आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोटकलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती, ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण ४ खालील कार्यवाही पूर्ण होईल त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही.

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिका-यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दी पुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेला कोणत्याही हाणीची किंवा क्षतीची जिल्हाधिका-याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) नुसार जिल्हाधिकारी , भूसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त नियम " असा करण्यात आलेला आहे.) त्यांच्या नियम १०, उपनियम (३) द्वारे विहीत केल्याप्रमाणे भूमी अभिलेखाच्या अद्यावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये, समुचीत शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखाली जिल्हाधिका-यांची कार्य पार पाडण्यासाठी श्रीमती शिवनंदा लंगडापूरे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्रमांक-३), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ नागपूर यास पदनिर्देशीत करीत आहे.

**अनुसूची-एक**

**जमिनीचे वर्णन**

भूसंपादन प्रकरण क्रमांक ०२-अ-६५-२०१९-२०२०, प.ह.नं. ७६, गाव सोमनाळा, तालुका भिवापूर, जिल्हा नागपूर.

| अनुक्रमांक | सर्व्हे क्र. | संपादनाखालील क्षेत्र (अदमासे) |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | हे. आर |
| १ | ५७/१ | १ १९ |
| २ | ७१ | १ ०० |

**अनुसूची-एक–**चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| | | हे. आर |
| ३ | ७४/१ | ० २३ |
| ४ | ७९/१-१ | ० ८१ |
| ५ | ७९/२-१ | ० २० |
| ६ | ८१/१ | ० ९६ |
| | एकूण . . | ४ ३९ |

**अनुसूची-दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाचे विवरण**

प्रकल्पाचे नाव : गोसेखुर्द प्रकल्प.

प्रकल्प कार्याचे वर्णन : गोसेखुर्द धरणाअंतर्गत बुडीत क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत.

समाजाला मिळणारे लाभ : गोसेखुर्द राष्ट्रीय प्रकल्पाअंतर्गत असून योजनेची सिंचन क्षमता निर्मितीचे उध्दीष्ट साध्य करणेसाठी संपादन पूर्ण करणे आवश्यक आहे व याचा लाभ शेतीसाठी, सार्वजनीक पाणीपुरवठा व उद्योगधंदे करीता होणार आहे.

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

विस्थापीत होत नाही.

**अनुसूची-चार**

सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास : करणा-या अभिकरणाने दिलेला) सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश. : भूमी संपादन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १० (क) अन्वये महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई, यांची अधिसूचना दिनांक १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनीयमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागु करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

**अनुसूची-पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

अ. प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-याचे पदनाम : निरंक

आ. प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता : निरंक

इ. ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली त्या अधिसूचनेचा तपशील. : निरंक

**टीप** : उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ३), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांचे कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

नागपूर :
दिनांक ४ जानेवारी २०२२.

**श्रीमती शिवनंदा लंगडापुरे,**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन क्र. ३),
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर.

ना.-एक-२ (१७३०).

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.